# एएलएस रोगावरील नव्या औषधास अमेरिकेत मंजुरी



आरोग्य वार्ता

पीटीआ, वॉशिंग्टन

**अमायोट्रॉपिक लॅटरल** स्केरॉसिस या रोगावर दोन दशकात प्रथमच अमेरिकेत एका नवीन औषधास मान्यता देण्यात आली आहे. अमेरिकी अन्न व औषध प्रशासनाने गेल्या आठवड्यात मान्यता दिलेल्या या औषधाचे नाव रॅडिकावा म्हणजे एडराव्होन असे आहे. त्याचा वापर अमायोट्रॉपिक लॅटरल स्केरॉसिस (एएलएस) म्हणजे लो घेरिंग आजारावर होतो. एएलएस हा दुर्मीळ आजार असून त्यात मेंदूतील चेतापेशी मरतात व त्यामुळे स्नायूवरील ताबा जातो. जपानमध्ये रॅडिकावा म्हणजे एडराव्होन हे औषध आधी मंजूर करण्यात आले होते पण अमेरिकेत ते मंजूर होण्यासाठी वाट पाहावी लागली. असे न्यूरोलॉजी प्रॉडक्ट्स विभागाचे उपसंचालक एरिक बास्टिंग्ज यांनी सांगितले. एफडीएने प्रथमच नवीन औषध मंजूर केले आहे व अनेक वर्षांत कुठलेच नवे औषध मंजूर करण्यात आले नव्हते. एएलएसमुळे चेतापेशी मरतात व त्यामुळे स्नायू कमकुवत होतात. नंतर त्यातून पक्षाघातही होतो. यूएस सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँण्ड प्रिव्हेन्शन या संस्थेच्या मते १२ ते १५ हजार लोकांना अमेरिकेत एएलएस आहे. यातील लोक श्वसनाच्या विकाराने ३ ते ५ वर्षांत मरतात. रॅडिकावा हे नसेत टोचण्याचे औषध असून ते अनुभवी डॉक्टरच देऊ शकतात, सुरुवातीला १४ दिवस रोज व नंतर १४ दिवस औषधमुक्त असे त्याचे उपचारचक्र आहे. नंतर १० दिवस औषध दिले जाते व १४ दिवस दिले जात नाही. या औषधाचे अनेक दुष्परिणाम अधिक आहेत, कारण त्यात सोडियम हायसल्फाइड असते.




बद्धकोष्ठता...?
शारंगधर
शारंगधर सुखसारक वटी
सकाळी पोट टकाटक !!
आयुर्वेदिक टॅब्लेट्स
कोणत्याही दुष्परिणामांशिवाय नैसर्गिकरित्या पोट साफ होण्यास मदत करते आणि सवय लागत नाही.
● सर्व प्रमुख औषधी दुकानात उपलब्ध ● Buy Online : www.sharangdhar.com ● मोफत वैद्यकिय सल्ला - 95 95 100 500

# राजीव गांधी आरोग्य योजना शहरापुरतीच

## ‘सेहत’ संस्थेच्या अभ्यासपूर्ण अहवालाचा निष्कर्ष


प्रतिनिधी, मुंबई

**दारिद्र्यरेषेखालील नागरिकांना** वैद्यकीय सेवेचा लाभ घेता यावा या उद्देशाने सुरू करण्यात आलेली राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना शहर आणि मध्यमवर्गीयांपुरतीच मर्यादित असल्याचा निष्कर्ष सेहत संस्थेने मांडला आहे. या योजनेचा अभ्यासपूर्ण विस्तृत अहवाल सेहत संस्थेने राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या संस्थेसमोर नुकताच सादर केला आहे. महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना असे नामकरण करून येत्या ऑगस्टमध्ये नव्याने आणण्यात येणारी ही योजना राज्यातील सर्व गरजू रुग्णांपर्यंत पोहचावी, यासाठी काही शिफारशीही या अहवालाच्या माध्यमातून करण्यात आल्या आहेत.

गरजू रुग्णांना कमीत कमी खर्चामध्ये वैद्यकीय सेवा देण्याच्या या उद्देशाने जुलै २०१२ साली राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरू करण्यात आली. या योजनेचे वैशिष्टय म्हणजे सरकारी रुग्णालयाबरोबरच सरकारने करार केलेल्या खाजगी रुग्णालयांमध्येही नागरिकांना या योजनेअंतर्गत उपचार घेणे शक्य झाले. यासाठी सरकारने राज्यभरातील ४७३ रुग्णालयाशी करार केला असून ९७१ प्रकारच्या वैद्यकीय सेवांचा यात समावेश केलेला आहे. सरकारने करार केलेल्या रुग्णालयांपैकी ८४ टक्के रुग्णालये ही खाजगी आहेत. या योजनेमध्ये अनेक त्रुटी असून खऱ्या लाभार्थीपर्यंत ही योजना पोहचलीच नसल्याचा निदर्शनास आणणारा अभ्यासपूर्ण अहवाल सेहत संस्थेच्या सुचित्रा वागळे व नेहल शाह यांनी मांडला आहे. दारिद्र्य रेषेखालील रुग्णांना वैदयकीय सेवा कमीत कमी खर्चात मिळाव्यात या उद्देश्याने सुरू करण्यात आलेली ही योजना मात्र शहरभाग सोडता अन्य मागासलेल्या राज्यांमधील फक्त १२ टक्के रुग्णालयांमध्येच राबविण्यात आली आहे. उदा. ६५ टक्क्याहून अधिक आदिवासी लोकसंख्या असेलल्या नंदुरबार राज्यामध्ये फक्त एका म्हणजेच सरकारी रुग्णालयामध्ये ही योजना राबविण्यात येत आहे. परिणामी या योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना मुंबई, पुणे, नागपूर आदी शहरांमधील रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल व्हावे लागत असल्याचे आढळले आहे, असे अहवालात मांडण्यात आले आहे. या योजनेअंर्तगत ९७१ वैद्यकीय सेवा देण्याचे नमूद जरी असले तरी राज्यातील बहुसंख्य खाजगी रुग्णालयांमध्ये यातील काही खर्चिक व महत्त्वाच्या वैद्यकीस सेवा उपलब्धच नाहीत. या वैद्यकीय सेवांमध्ये समावेश असणाऱ्या कर्करोगाच्या विविध उपचार पद्धती १५ हून अधिक जिल्हयांमधील खाजगी रुग्णालयांमध्ये होतच नाहीत. तसेच खेड्यापाड्यातील गरजू रुग्णांपर्यंत या सेवेचा प्रचार आणि प्रसार अजून पोहचलेलाच नाही, असेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या योजनेचे खरे लाभार्थी असलेल्या अन्नपूर्णा व अंत्योदय रेशनकार्ड धारकांपैकी अनुक्रमे ०.१ व १.८ टक्के नागरिकांनीच आत्तार्यत या सेवेचा लाभ घेतला आहे.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचे नाव बदलून महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना असे नामकरण लवकरच करण्यात येणार आहे. नामकरण करुन नव्याने अमलात येणारी योजना ही त्रुटीरहित असावी, यासाठी काही शिफारशी या अहवालाच्या माध्यमातून मांडण्यात आल्या आहेत. या योजनेच्या लाभार्थी संख्येवरच फक्त लक्ष केंद्रित न करता या योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या खाजगी संस्थांमधून या योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय सेवांवर देखरेख करणारी व्यवस्था निर्माण करावी. योजनेत समाविष्ठ असणाऱ्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध असणाऱ्या खाजगी रुग्णालयांशीच करार केले जावेत. करार केलेल्या रुग्णालयांची संख्या ही तुलनेने फार कमी असल्याने अधिकाधिक रुग्णालये या योजनेअंतर्गत जोडून घ्यावीत. अहवालातून सुचविण्यात आलेल्या शिफारशी नव्या योजनेत अमलात आणण्यासाठी आम्ही सातत्याने याचा संस्थेकडे पाठपुरावा करणार असल्याचे सेहत संस्थेच्या समन्वयक संगीता रेगे यांना लोकसत्ताशी बोलताना सांगितले.

### योजनेतील त्रुटी...



- बीड, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जालना, नंदुरबार, उस्मानाबाद, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्ग आणि वाशिम या मागासलेल्या जिल्हयांमध्ये सर्वात कमी रुग्णालयांमध्ये ही योजना उपलब्ध.
- खर्चिक असणाऱ्या कर्करोगाच्या उपचार पद्धतींचा १५हून अधिक जिल्ह्यांमध्ये अभाव.
- अन्नपूर्णा व अंत्योदय कार्डधारक लाभार्थींचे प्रमाण नगण्य.
- योजनेचा प्रचार व प्रसार शहरांपुरता मर्यादित.

# काळाचौकीत ट्रक इंधन टाकीच्या स्फोटात तरुणाचा मृत्यू

खास प्रतिनिधी, मुंबई

**काळाचौकी येथील** बॅरिस्टर नाथ पै मार्गावरील खासगी गॅरेजमध्ये डागडुजीदरम्यान महापालिकेच्या क्लीनअप ट्रकच्या इंधन टाकीचा स्फोट झाला. मंगळवारी दुपारी चारच्या सुमारास घडलेल्या या अपघातात डागडुजीसाठी ट्रकखाली शिरलेल्या अब्दुल्ला रेहमान(२५) याचा जागीच मृत्यू झाला. तर ट्रकचा क्लीनर सीराज अहमद (२५) गंभीररीत्या जखमी झाला. काळाचौकी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक दिलीप उगळे यांच्या माहितीनुसार सीराज ८५ टक्के भाजला असून त्याच्यावर जेजे रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी गॅरेज मालकाविरोधात गुन्हा नोंदवण्याचे काम सुरू आहे.

# भारनियमनाचे चटके!

**नागपूर :** कोयना धरणातील पाण्याचा अतिरिक्त वापर, कोळसा उपलब्ध होण्यात निर्माण झालेल्या अडचणी, हलक्या प्रतीचा कोळसा, बंद पडलेले संच यातून सध्या राज्यात दीड हजार ते चार हजार मेगावॅट विजेचे भारनियमन करावे लागत आहे. ऊर्जा खात्याचे कोलमडलेले नियोजन आणि खासगी कंपन्याही अपयशी ठरल्याने हा प्रश्न गंभीर बनला आहे.

राज्यात सध्या विजेची एकूण मागणी २२ हजार ५०० मेगावॅट असून त्यातील महावितरणची कमाल मागणी १९ हजार ५०० मेगावॅटच्या जवळपास आहे. उन्हाळ्यात राज्याच्या विविध भागात तापमान वाढल्यामुळे कूलर व वातानुकूलित यंत्रासह कृषिपंपाचाही वापर वाढला आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात वीज वापरली जात आहे. गेल्या काही दिवसांत विजेच्या मागणीत सुमारे १,५०० मेगावॅटने वाढ झाली. त्यातच महानिर्मितीचे विविध कारणांनी सहाहून जास्त संच बंद आहेत, त्यात कोराडीतील २, भुसावळचे २, परळीचे २, चंद्रपूरच्या एका संचासह कोयनातील संचांचा समावेश आहे. यामुळे सुमारे २,५०० हजार मेगावॅट विजेचा तुटवडा आहे.




जन शिक्षण संस्थान(Govt. of INDIA)
औद्योगिक व्यवसाय मार्गदर्शन केंद्र
Ministry of Human Resource Devlopment
Email : mhrdtrainings@gmail.com
सरकारी कर्ज योजना ● पंतप्रधान रोजगार योजना
● ब्रॅन्डींग आणि लघुउद्योग याबाबत संपूर्ण मार्गदर्शन
गव्हर्नमेंट सर्टिफिकेट कोर्स
मधमाशी पालन (१३ व १४ मे २०१७)
कुपोषणाशी लढा
* कमीत कमी भांडवलाचा व्यवसाय *
१) मधमाशांच्या जाती २) उद्योगासाठी लागणारा कच्चा माल ३) मधमाशा पालनाची अवजारे ४) मधमाशा पालनाचे व्यवस्थापन ५) मधापासून कुपोषणाचे उच्चाटन ६) फॅक्टरी व्हिजीट-तळेगाव
8082300033/9892620237
ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, स्थानिक राज भवन, सी. डी बर्फीवाला मार्ग, जुहू लेन, अंधेरी (प.), मुंबई-५८
वेळ-१० ते ५ ● नाश्ता, जेवण समाविष्ट

TATA
TATA STEEL LIMITED
Registered Office: Bombay House, 24 Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282, Fax No.: +91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी लेखापरिक्षित अलिप्त आणि अलेखापरिक्षित एकत्रित वित्तीय विवरणे आणि निष्कर्ष ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षित अलिप्त आणि एकत्रित वित्तीय विवरणे आणि निष्कर्ष अन्य बाबींसह विचारात घेऊन अभिलिखित करण्यासाठी आणि ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी असल्यास लाभांशाची शिफारस करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची एक बैठक मंगळवार, १६ मे, २०१७ रोजी होणार आहे.

वित्तीय निष्कर्ष कंपनीची वेबसाईट www.tatasteel.com वर तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाईट www.nseindia.com आणि बीएसई लिमिटेडची वेबसाईट www.bseindia.com वरही उपलब्ध करून देण्यात येतील.

टाटा स्टील लिमिटेड
सही/-
पार्वथीसम के.
कंपनी सेक्रेटरी

मुंबई
दिनांक : ८ मे, २०१७

TATA STEEL

सत्यमेव जयते
भारत सरकार
एमएसएमई मंत्रालय, भारत सरकार
एमएसएमई तंत्रज्ञान केंन्द्र, (आय. डी. ई. एम. आय.), मुंबई
नवीन इमारतीचा आधारशिला समारंभ सोहळा
शुभ हस्ते
श्री कलराज मिश्रा
माननीय मंत्री,
सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम मंत्रालय,
भारत सरकार
श्री देवेंद्र फडणवीस
माननीय मुख्यमंत्री,
महाराष्ट्र
बुधवार, दिनांक १० मे, २०१७ रोजी सकाळी ११:०० वाजता
प्रमुख उपस्थिती मध्ये
श्री गिरिराज सिंह
माननीय राज्यमंत्री,
सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम मंत्रालय,
भारत सरकार
श्री हरीभाई पारथीभाई चौधरी
माननीय राज्यमंत्री,
सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम मंत्रालय,
भारत सरकार
श्री सुभाष देसाई
माननीय मंत्री,
उद्योग आणि खाणिकर्म
महाराष्ट्र
MAKE IN INDIA
IDEMI
स्थळ: एमएसएमई तंत्रज्ञान केंन्द्र, (आय. डी. ई. एम. आय.)मुंबई, शीव, चुन्नाभट्टी, मुंबई - 400022
फोन: 022 - 24050301/2/3/4, फैक्स: 022 - 24050016,

समता न्याय एकात्मता
महाराष्ट्र शासन
समाज कल्याण आयुक्तालय
barti
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
प्रज्ञा शील करुणा
विश्व समता दिन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
द्वारा आयोजित
महाकारुणिक तथागत भगवान गौतम बुध्द व
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विश्वशांती परिषद
कार्यक्रमाचे उद्घाटक व मुख्य अतिथी
मा. ना. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा. ना. थावरचंद गेहलोत
केंद्रीय मंत्री, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय,
भारत सरकार
प्रमुख उपस्थिती
मा. ना. रामदास आठवले
केंद्रीय राज्यमंत्री,
सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय,
भारत सरकार
मा. ना. किरण रिजीजू
केंद्रीय राज्यमंत्री, गृह,
भारत सरकार
विशेष उपस्थिती
मा. ना. विनोद तावडे
मंत्री, शिक्षण व सांस्कृतिक कार्य,
महाराष्ट्र राज्य
मा. ना. सुभाष देसाई
मंत्री, उद्योग तथा पालकमंत्री,
मुंबई
मा. ना. राजकुमार बडोले
मंत्री, सामाजिक न्याय व
विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र राज्य
मा. ना. दिलीप कांबळे
राज्यमंत्री, सामाजिक न्याय व
विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र राज्य
मा. विश्वनाथ महाडेश्वर
महापौर,
मुंबई
मा. अरविंद सावंत
खासदार,
मुंबई
मा. राज पुरोहित
विधान सभा सदस्य,
कुलाबा मतदार संघ, मुंबई
मा. राहुल नार्वेकर
विधान परिषद सदस्य,
कुलाबा, मुंबई
विशेष निमंत्रीत
मा. सरोजा सिरीसेना
राजदुत, श्रीलंका
मा. एकापोल पोलपीपट
राजदुत, थायलंड
वैशाख पौर्णिमा बुधवार, दि. १० मे २०१७
विश्वशांती रैली : काळा घोडा, फोर्ट, मुंबई, सायंकाळी ५.३० वा.
विश्वशांती परिषद : गेट वे ऑफ इंडिया, मुंबई, सायंकाळी ६.०० वा.
येथे संपन्न होत आहे, या सोहळयास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.
विनीत
दिनेश वाघमारे, भा.प्र.से.
सचिव, सामाजिक न्याय व
विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
पीयूष सिंह, भा.प्र.से.
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे
राजेश ढाबरे, भा.रा.से.
महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व
संशोधन संस्था, पुणे
रैलीमध्ये सहभागी होऊ इच्छिणा-यांनी प्राधान्याने श्वेत वस्त्र परिधान करावी.